# १. पाइअ-कव्वं

प्राकृत काव्याची महती काय वर्णावी? त्याची महती सांगणारी सुभाषिते, गाथासप्तशती, गउडवहो, वज्जालग्गं इत्यादी महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांमधून निवडून या पाठात एकत्र करण्यात आलेली आहेत. प्राकृत पद्य सरळ, सुलभ, वृत्तबद्ध आणि मधुर आहे, असे विद्वानांनी प्राकृत काव्याचे गुणगान केले आहे.

पाइअकव्वस्स णमो, पाइअकव्वं च णिम्मिअं जेण।
ताहं चिअ पणमामो, पढिऊण य जे वि याणंति।।१।।

देसिय-सद्द-पलोट्टं, महुरक्खर-छंदसंठिअं ललियं।
फुड-वियड-पायडत्थं, पाइअकव्वं पढेअव्वं।।२।।

पाइअकव्वम्मि रसो जो जायइ तह व छेयभणिएहिं।
उवअस्स व वासियसीअलस्स तित्तिं ण वच्चामो।।३।।

णवमत्थ-दंसणं संणिवेस-सिसिराओ बंधरिद्धीओ।
अविरलमिणमो आ-भुवण-बन्धमिह णवर पअअम्मि।।४।।

सअलाओ इमं या विसंति एत्तो अ णेंति वाआओ।
एंति समुद्दं च्चिअ णेंति साअराओ च्चिय जलाइं।।५।।

गूढत्थ-देसि-सहिअं सुललिय-वण्णेहिं विरइअं रम्मं।
पाइअ-कव्वं लोए कस्स ण हियअं सुहावेइ।।६।।

पाइअ-भासा-रइआ मरहट्ठय-देसि-वण्णय-णिबद्धा।
सुद्धा सअल-कह च्चिअ तावस-जिण-सत्थ-वाहिल्ला।।७।।

अमिअं पाउअ-कव्वं पढिउं सोउं अ जे ण याणंति।
कामस्स तत्ततंतिं कुणंति ते कहं ण लज्जंति।।८।।

एमेअ मुद्ध जुअइ-मणोहरं पाअआए भासाए।
पविरल-देसि-सुलक्खं कहसु कहं दिव्व-माणुसिअं।।९।।

## सद्दत्था

**पाइअकव्वस्स –** प्राकृत काव्याचे

**सद्द –** शब्द

**महुरक्खर –** महुर + अक्खर - मधुर अक्षर

**ललियं –** सुंदर, आकर्षक

**वियड –** कठीण

**पढेअव्वं –** वाचावे

**जायइ –** उत्पन्न होणे

**उवअस्स व –** पाण्याप्रमाणे

**वासियसीअलस्स –** वासिय (ठेवलेले शिळे अन्न पदार्थ) आणि थंडगार अन्नाचे

**ण वच्चामो –** मिळत नाही (पोहोचत नाही)

**दंसण –** दर्शन, दृष्टी (सौंदर्य)

**सिसिराओ –** शिशिर ऋतूमध्ये

**अविरलमिणमो –** अविरलं + इणमो - हा पूर्णपणे

**आ–भुवण–बंधमिहं –** संपूर्ण विश्वाविषयीचे हे काव्यबंध किंवा रचना

**सअलाओ –** सकल, सर्व

**या –** ज्या

**एत्तो –** येथून

**वाआओ –** वाणी, बोलीभाषा

**समुद्दं –** समुद्रात

**साअराओ –** सागरातून

**गूढत्थ –** गूढ किंवा रहस्यमय अर्थ

**विरइअं –** रचलेले, रचना केलेले

**लोए –** जगात

**हिअअं –** हृदय

**मरहट्टय –** महाराष्ट्री

**सुद्धा –** शुद्ध

**तावस –** तपस्वी साधू

**सत्थ –** तांडा, समूह

**याणंति –** जाणतात, समजतात

**पलोट्टं –** खूप, भरपूर

**छंदसंठिअं –** छंदात असलेले

**फुड –** स्पष्ट

**पायडत्थं –** स्पष्ट करण्यासाठी

**रसो –** रस, रुची

**छेयभणिएहिं –** चतुर किंवा विद्वानांनी स्पष्ट केलेले

**तित्तिं –** तृप्ती किंवा समाधान

**णवमत्थ –** नवीन अर्थ

**संणिवेस –** रचना (प्राकृतिक)

**बंधरिद्धीओ –** काव्यबंधाचे वैभव

**णवर –** केवळ, फक्त

**पअअम्मि –** प्राकृत भाषेत (प्रकृती म्हणजे निसर्गाप्रमाणे)

**इमं –** ह्या

**विसंति –** मिसळतात, प्रवेश करतात, भेटतात

**णेंति –** घेऊन जातात, नेतात, निघतात

**एंति –** येतात

**च्चिअ –** (अव्यय) निश्चयवाची

**जलाइं –** पाणी (अनेकवचन)

**देसि –** देशी शब्द

**वण्णेहिं –** अक्षरांमुळे

**रम्मं –** रम्य, मनोहर, सुंदर

**सुललिय –** अत्यंत सुंदर

**कस्स ण सुहावेइ –** कोणाला सुखाविणार नाही?

**वण्णय–णिबद्धा –** वर्णन केलेले आहे

**सअल–कह –** सकल कथा

**जिण –** तीर्थंकर

**वाहिल्ला –** व्याधिग्रस्त, रुग्ण

**एमेअ –** एम + एअ - अशी ही

**जुअइ –** युवती

**दिव्व** – देवतासंबंधी
**माणुसिअं** – मनुष्यसंबंधी
**पविरल** – विस्तृत, पसरलेली
**कहसु** – सांगा

**पाअआए भासाए** – प्राकृत भाषारूपी (युवती)
**मुद्धा** – भोळी भाबडी, निर्दोष
**मणोहरं** – सुंदर, आकर्षक
**सुलक्खं** – शुभ लक्षणांनी युक्त
**कहं** – कथा ('कहा' या शब्दाची द्वितीया विभक्ती)

## सज्झाओ

१ अ) **खालील शब्दांमधील अक्षरांच्या बदलाविषयीचे नियम सांगा.**

प्राकृत (पाइअ), काव्य (कव्व), प्रणम (पणम), अक्षर (अक्खर), शब्द (सद्द), अर्थ (अत्थ), सार्थ (सत्थ ), वर्णक (वण्णअ), मुग्ध (मुद्ध), सुलक्ष(ण) (सुलक्ख), दिव्य (दिव्व), हृदय (हिअअ), समुद्र (समुद्द).

ब) **पुढील शब्दांतील व्यंजनांचे बदल सांगा.**

विअड, सीअल, भासा, बाहि, सुह, साअर, वाआओ, कहा, तावस

क) **या पाठातील देशी, तद्भव व तत्सम शब्दांची यादी करा.**

ड) **या पाठाच्या आधारे 'य-श्रुति'चा नियम स्पष्ट करा.**

इ) **'प्राकृतभाषा' या विषयावर माध्यम भाषेत १० ओळींचा निबंध लिहा.**

२ **पुढील पद्य पूर्ण करा.**

१. देसिय-सद्द ............................................................... ।
............................................................... पढेअव्वं ।

२. गूढत्थ-देसि ............................................................... ।
............................................................... हिअअं सुहावेइ ।

३. अमिअं पाउअ-कव्वं ........................................ ................ ।
............................................................... ण लज्जंति ।।

❋❋❋